Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 631 – 634
DOI: 10.5281/zenodo.10278950

Original Research Article

# मार्क्सवाद आणि गांधीवाद

प्रा. डॉ. संजय काळे

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, भोकर जि. नांदेड ४३१८०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sanjaykale937@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

मार्क्सवाद ही एक सैध्दांतिक विचारधारा आहे,आपण राहतो या जगाबद्दलची आणि या जागाचा भाग असलेल्या मानवी समाजाबद्दलची सैध्दांतिक विचारसरणी आहे.मार्क्सने एंगल्सच्या मदतीने 19 व्या शतकाच्या मध्य व उत्तर भागात तिची मांडणी केली,म्हणून ती मार्क्सच्या नावाने ओळखली जाते.मानवी समाज आज आहे असाच का आहे,तो का बदलतो आणि भविष्यकाळात मानवजातीला आणखी कोणते बदल पहावयास मिळणार आहेत या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[1] मार्क्सने आपल्या 'दास कॅपिटल' ग्रंथात प्रामुख्याने श्रमिकांचे शोषण, भांडवलप्रधान अर्थव्यवस्था आणि सामाजिक मुल्यांसंबंधीचे विचार मांडले. समाजवादी समाजरचना ही अपरिहार्य असल्यामुळे ती विशिष्ट नियमानुसार स्थापन होणारच असे तर्कसंगत युक्तीवाद करुन ते पटवून देण्याचे काम त्यांनी केले.म्हणून त्यांच्या समाजवादी विचाराला शास्त्रीय समाजवाद असे नाव दिले जाते.वर्गसंघर्षाने मानवी समाजाचा विकास कसा होत गेला या संबंधीचे विस्तृत विवेचन त्यांनी केले.[2]

गांधीवाद हा प्रामुख्याने सत्य आणि अहिसेंवर आधारित आहे.मानव समाजाचे अस्तित्व अहिंसेवर आधारलेले आहे.गांधीजींच्या सामाजिक आणि राजनैतिक कार्याचा आधार सत्य आणि अहिंसा हेच राहीले आहे. त्यांच्यामते, शोषीत, पिडीत, दबल्या गेलेल्या आणि संपूर्ण जगाची मुक्ती ही पूणत: सत्य आणि अहिंसा यावरच निर्भर आहे. गांधीजींच्या मते, श्रीमंत व गरीब असा भेद करणारी अर्थव्यवस्था नको.संपत्तीवर कोणाचीही मालकी नसावी.संपत्तीचा उपभोग घेण्याचा नैतिक अधिकार गरीब व श्रीमंत या दोघांचाही आहे.त्यासाठी त्यांनी विश्वताची कल्पना मांडली.गांधीना आर्थिक विषमता कमी करण्यासाठी हाच मार्ग योग्य वाटला.मानवी स्वभाव बदलू शकतो यावर गांधीजींची श्रध्दा होती.

**मार्क्सवाद**

19 व्या शतकात युरोपमध्ये मार्क्सवाद हा एकमेव विचार होता ज्याने साम्राज्यवादाच्या विरुध्द जनतेची बाजू घेतली.लोकशाहीचा प्रश्न, श्रमिकांचे शोषण, स्त्रीयांचे अधिकार आणि साम्राज्यवादाचा प्रश्न यावर मार्क्सवादाने जगातील प्रत्येक देश आणि समाज यांना जागृत केले.[3] मार्क्सवादाचे हे म्हणने आहे की,इतिहासाच्या खऱ्या शास्त्राने जनतेचा,जनसमूदायाचा विचार केला पाहिजे[3] सर्व मानवी इतिहसामधून धावणाऱ्या नैसर्गिक धाग्याचा मार्ग काढण्यासाठी मार्क्सवाद इतिहासाच्या अभ्यासाकडे वळतो आणि त्यासाठी तो समाजाकडे लक्ष देतो,व्यक्तीकडे नाही.

मानवी समाजाचा विकास कसा होत गेला या संदर्भात मार्क्सने आपले विचार मांडले.हे मांडताना त्यांनी इतिहासाचे विश्लेषण केलेले असून; समाजाचा विकास उत्क्रांतीच्या तत्वानूसार एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत कसा होत जाते याचे प्रंतिपादन केले.भांडवलशाहीची स्थिती समाजाच्या उत्क्रांतीतील एक टप्पा असल्यामुळे ज्या नियमानुसार भांडवलशाही निर्माण झाली त्याच नियमानुसार भांडवलशाहीचा ऱ्हास होऊन साम्यंवादी अर्थव्यवस्था निर्माण होईल असे मत मांडले.त्यासाठी त्यांनी विरोध विकासाचा सिधांत व इतिहासाची भौतिक मीमांसा या संदर्भात विचार मांडले.

**वर्ग आणि वर्गसंघर्ष**

सरंजामदारी समाजात जमिनदार व भूदास हे दोन वर्ग निर्माण होतात.संपूर्ण जमिनीवर सरंजामदार वर्गाची मालकी प्रस्थापीत झालेली असते.हा जमिनदाराचा वर्ग भूदासाना आपल्या जमिनीवर कष्ट करण्यास लावून उत्पादनाचा मोठा हिस्सा तो स्वंत:कडे ठेवून घेत असत.कष्ट करुनदेखील भूदासाना अल्पसा मोबदला मिळत असत.यातून या दोन वर्गात सतत संघर्ष होऊन नवीन व्यवस्था निर्माण होते.

भांडवलशाही समाजात भांडवलावरती मालकी मोठयाप्रमाणात भांडवलदाराची प्रस्थापीत झालेली असते.भांडवलावर असलेल्या मालकीच्या बळावर हा वर्ग कामगार वर्गास आपल्या कारखान्यात राबवून घेतो व त्यास अल्पसा मोबदला देतो.कामगार वर्गाचे अधिकाधिक शोषण हा भांडवलदार वर्ग करतो. यातून या दोन वर्गात संघर्ष होतो.कामगाराचे शोषण करण्यासाठी भांडवलदार वर्ग कामगारांना कमी वेतन देणे,जास्तं वेळ काम करुन घेणे अशा विविध युक्त्या वापरतो.कामगारांने निर्माण केलेले अतिरिक्तं मूल्यं तो स्वत:च्या खिशात घालतो.कामगार वर्गाचे शोषण होत असल्यामुळे हा वर्ग संघटित होतो व संघर्ष करतो.यातून भांडवलंदार व कामगार संघर्ष होवून समाजवादी अर्थव्यवस्था उदयास येते.

समाजवाद ही वर्गविहीन अवस्था येणे अटळ आहे, असे मार्क्स म्हणतो.यामधील सामाजिक गरजेनुसार उत्पादन ठरते व उत्पादनाची सर्व साधने सामाजिक मालकीची असतात. अर्थात या व्यवस्थेत कोणीही मालक असणार नाही. त्यामुळे शोषणाचा प्रश्न निर्माण होणार नाही. याच समाजाची पुढची प्रगत अवस्था साम्यवादाची राहील. यामध्ये प्रत्येकाला त्याच्या क्षमतेनुसार काम आणि गरजेनुसार उत्पन्न मिळेल.

**गांधीवाद**

म.गांधी यांचे विचार हे सत्य,अहिंसा,श्रमप्रतिष्ठा आणि साधेपणा या तत्वावर आधारित आहेत.किमान गरजा आणि साधी राहणी गृहित धरुन त्यांनी आपले विचार मांडले.मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित केल्या आणि राहणी साधी ठेवली तर मनुष्याला सुख आणि समाधान प्राप्त होते असे त्यांचे मत होते.गांधीजींच्यामते,पैसा हे मानवाच्या आवश्यंक गरजाच्या पूर्तीचे एक साधन आहे,साध्य नाही.आर्थिक क्रियांचा उद्देश उपभोग नसून त्याग आहे.त्यांनी जीवनाच्या आवश्यक मूलभूत गरजात अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण व अभ्यास या गरजांना अनिवार्य मानले आहे, व बाकीच्या गरजा कमी करण्याच्या विचारावर भर दिला आहे.त्यांच्या आर्थिक विचारात विलासी जीवनाला स्थान नाही; ते साधी राहणी व उच्च विचारसरणीचे समर्थक होते.उच्च जीवन हे अधिक गरजाच्या उपभोगावर आधारित नसून उच्च आदर्शावर आधारित आहे.

गांधीजीनी सत्य आणि अहिंसे बरोबरच अपरिग्रंहाला स्थान दिले.अपरिग्रह म्हणजे संग्रह न करण्याची वृत्ती.त्यांच्या आदर्श समाजात ही वृत्ती गृहित धरल्यामुळे उत्पन्न आणि संपत्तीच्या विषमतेला वाव नाही.परंतु ही अवस्था साध्य होईपर्यंत समाजातील श्रीमंत लोकांनी स्वत:ला त्या संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समजावे अशी त्यांचे अपेक्षा होती. श्रीमंत मनुष्याकडे त्याची संपत्ती तशीच राहील, पण त्याच्या वाजवी वैयक्तिक गरजासाठी जेवढा भाग आवश्यक असेल तेवढाच तो वापरेलं. उर्वरित संपत्तीचा तो विश्वस्त असावा, व तो भाग समाजासाठी खर्च व्हावा" जरी एखादया व्यापार किंवा उदयोगातून नफा मिळवित असेल, किंवा वडिलोपार्जित धन मिळाले असेल, तरी ती संपूर्ण संपत्ती त्याची नसून समाजाची असते.

वर्तमान परिस्थितीत भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील असलेले दोष दूर करण्यासाठी व संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी गांधीजीने विश्वस्ताची कल्पना मांडली, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जगातील कांही देशात रक्तरंजित क्रांत्या झाल्या. परंतु गांधीजीनी रक्ताचा एक थेंबदेखीलं न सांडता अगदी अहिंसक मार्गाने आर्थिक विषमता दूर करण्याचा एक अभिनव प्रयोग सांगितला.त्यालाच गांधीजीची विश्वस्ताची कल्पना असे म्हटले जाते.गांधीजीनी समाजातील आर्थिक विषमता अत्यत शांततामार्गाने,कोणाचाही व्देष न करता,कोणावरही जबरदस्ती न करता अहिंसेच्या मार्गाने दूर करणे शक्य आहे,असे मत मांडले. भांडवलदार वर्गाची समाप्ती गांधीजी ह्रदयपरिवर्तनातून करु इच्छित होते. गांधीजींच्या विश्वस्ताच्या कल्पनेत भांडवलशाहीला धारा नाही. भांडवलदार वर्गास सुधारण्यास संधी दिली.आणि मनुष्य स्वभाव सुधारु शकतो यावर गांधीजीची श्रध्दा होती.विश्वस्ताची कल्पना प्रत्यक्षात येताच वर्गसंघर्षाचा प्रश्न उरणार नाही. हा बदलेलेला भांडवलादार वर्ग श्रमिकांच्या कल्याणाची काळजी घेईल, व श्रमिकवर्ग देखील त्यांना हितैषी मानेल.

## सारांश

कार्ल मार्क्स यांने श्रमिकांच्या मुक्तीसाठी वर्गयुध्दाच्या आवश्यकतेवर भर दिला; याउलट म.गांधी यांनी अहिंसेचा मार्ग स्विकारत ह्रदयपरिवर्तनावर भर दिला.भांडवलदार व जमिनदारांच्या ह्रदयपरिवर्तनावर त्यांचा विश्वास होता.मार्क्सनी समाजवादाच्या समर्थनार्थ वैज्ञानिक सिध्दांत मांडला.भांडवलदाराविरुध्द कामगार वर्गाचा विजय हा वर्गसंघर्षावर आधारित पध्दती सांगितली.गांधीजीनी सत्यं व अहिंसा सिध्दांतावर आधारित क्रांतीकारी पध्दतीचा मार्ग स्विकारला.कार्ल मार्क्स व गांधीजी दोघाचे ही विचार वर्ग विहीन राज्याची व समाजाची स्थापना करणे हेच होते.दोघेही भांडवलशाही प्रणालीच्या विरोधात होते.दोघेही खाजगी संपत्ती विरोधी,व्यक्ती विकासा ऐवजी समाज विकासाला प्राधान्य देणारे होते.गांधीजी व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवतात; तर मार्क्स कामगारवर्गाचा उध्दार करण्यासाठी भांडवलशाही व्यवस्था नष्ट करण्याचे विचार मांडतात.गांधीजीच्यामते,अहिंसेच्या माध्यमातून एक आदर्श न्यायधिष्ठीत व्यवस्था निर्माण केली जाऊ शकते; तर मार्क्सचा अहिंसेवर विश्वास नव्हता.गांधीजी अध्यात्मिक मूल्यावर तर मार्क्सने भौतिक मूल्यावर भर दिला.साम्यवाद हिंसेचा आधार घेतो; गांधीवादानुसार हिंसेमुळे घृणा, क्रोध निर्माण होतो.अहिंसेमुळे दोन्ही पक्षाची उन्नती होते.मार्क्सवाद भौतिक साधनांचे समान वितरण करुन मतभेद व वर्गसंघर्षाच्या समाप्तीचा विचारक करतो; तर गांधीवाद व्यक्तीच्या भौतिकवादी विचाराचा विरोध करुन मनुष्यात अपरिग्रह विचाराचा विकास करुन स्वार्थी जीवन मुक्त करुन साधे जीवन जगण्यास प्रेरित करते.व समाजातील विषमता,संघर्ष नेहमी करिता निराकरण करण्यास सूचविते.

## संदर्भ सूची

१. एमिल बर्न्स (2017), मार्क्सवाद म्हणजे काय ? लोकवाड्.मय गृह,मुंबई, पृष्ठ 1,2,5,6,7

२. जे.ए.पाटील, संपादक (2009), आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन,कोल्हापूर,पृष्ठ 239, 240

३. एजाज अहमद (1996), आज के जमाने मे मार्क्सवाद का महत्व,प्रकाशन संस्थान, नई दिल्ली, पृष्ठ 21, 22

४. विजय कविमंडन (1990), आर्थिक विचारांचा विकास, श्री.मंगेश प्रंकाशन, नागपूर पृष्ठ 392, 393

५. भुपेश चिकटे (Jan.2015), Signiticance of Mahatma Gandhi’s Methodlology in 21st Century P-534,535 Published by, Gandhi Study Center, Wardha.